# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./१३०६/२०२० दि. १९/०३/२०२०

## परिपत्रक

**विषय:- कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत.**

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र. समय -२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व का.) दिनांक १८ मार्च, २०२०

२) उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण -२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दिनांक १९ मार्च, २०२०

उपरोक्त विषयाच्या व संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) चा प्रार्दूभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत अधिसुचना निर्गमित केली आहे. या अनुषंगाने विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य/प्राध्यापक/अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. दिनांक २० मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२० या कालावधीसाठी विद्यापीठातील सर्व अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी हे संदर्भिय शासन निर्णयाप्रमाणे ५० टक्के अधिकारी व कर्मचारी आळीपाळीने कार्यालयात उपस्थित राहतील.
२. विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुखांनी आपआपल्या विभागातील ५० टक्के अधिकारी व कर्मचारी आळीपाळीने कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी आज दिनांक १९ मार्च, २०२० रोजी मा. कुलसचिव यांच्या कार्यालयात सादर करावी.
३. संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य यांनी उक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार कार्यवाही घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४. विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख, यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५. विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय विभाग/युनिट प्रमुख यांना आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयांतील अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः समय- २०२०/ प्र. क्र.३५/१८ (र. व का.)
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०२०.

**शासन निर्णय :**

जगभरातील अनेक देशांमध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार झाला आहे. त्यामुळे आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणावर जिवित हानी होत आहे. कोरोना विषाणूंमुळे बाधित रुग्ण आपल्या देशातील काही ठिकाणी आढळून आले आहेत.

२. वरील पार्श्वभूमीवर, कोरोना विषाणूंचा (COVID-19) प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील गर्दी कमी करणे आवश्यक आहे. त्यामुळे तातडीची उपाययोजना म्हणून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांना पुढील निदेश देण्यात येत आहेत.

अ) या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयाचे तातडीचे व महत्त्वाचे काम चालू राहण्याच्या दृष्टीने संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी, त्यांचे नियंत्रणाखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना दररोज कार्यालयात न बोलाविता त्यांना आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलवावे. तसेच उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन वेळेमध्ये लवचिकतेची सवलत देण्यासंदर्भातसुद्धा विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा, जेणेकरून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील अनावश्यक गर्दी कमी होऊ शकेल. अशा प्रकारे कार्यवाही करताना कार्यालयातील एकूण अधिकारी / कर्मचारी यांची संख्या ५० टक्के राहील, याची दक्षता घेण्यात यावी. अशा प्रकारे ज्या अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल, त्यांनी त्यांची प्रलंबित राहिलेली कामे कार्यालयातील उपस्थितीच्या दिवशी पूर्ण करावीत.

आ) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या बाबतीत मंत्रालयीन विभागातील सचिवांना त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांच्यासंदर्भात वरील अधिकार असतील. यासंदर्भात संबंधित सचिवांनी वरील परिच्छेद-२ (अ) मधील मुद्यांबाबत त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत निर्णय घ्यावा.

इ) वरील परिच्छेद-२ (अ) व (आ) बाबत विभागातील आस्थापना शाखेस अवगत करण्यात यावे, जेणेकरून अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतची उचित नोंद घेणे आस्थापना शाखेस शक्य होईल.

ई) शासकीय कार्यालयातील जे अधिकारी / कर्मचारी या आपत्कालीन परिस्थितीत रजा घेऊ इच्छितात त्यांना तातडीने रजा मंजूर करावी. तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता परिवर्तित रजासुद्धा संबंधितांना मंजूर करण्यास हरकत नाही.